**International Journal of Research in Economics and Social Sciences(IJRESS)**
Available online at http://euroasiapub.org/journals.php
Vol. 6 Issue 12, December 2016
ISSN: 2249-7382 Impact Factor: 6.225 | Thomson Reuters ID: L-5236-2015

# ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायातील भक्तियोग

डॉ. भारती खापेकर
सहयोगी प्राध्यापक
धनवटे नॅशनल कॉलेज
नागपूर

## प्रास्ताविक

मध्ययुगीन मराठी संतसाहित्य हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा आहे. तेराव्या शतकात ज्ञानदेवांचे समकालीन असलेले जेष्ठ कवी नामदेवमहाराज यांनी एक तरी ओली अनुभवावी असे म्हणुन भागवत धर्माचा प्रसार केला. आज अनेक वारकरी ग्यानबा तुकारामाचा जप करीत आषाढी कार्तिकिला पंढरपूरला जातात. ज्ञानदेवांचा ज्ञानेश्वरी म्हणजेच भावार्थ दिपिका हा ग्रंथ भगवद्गीतेवरील भाष्य होय. या ग्रंथात अठरा अध्याय आले आहेत.

ज्ञानेश्वरकालीन समाज वतवैकल्ये, कर्मकांड, यज्ञयाग इत्यादी बाहय गोष्टीला महत्व देत होता. धर्माच्या खऱ्या रूपाला फार मोठा भाग वंचित होता. सर्व धर्मग्रंथ संस्कृतमध्ये असल्यामुळे ते बहुजनांना वाचता येत नव्हते, म्हणून ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहिला. ज्ञानदेवांनी बाराव्या अध्यायातून भक्तियोगाविषयी निरूपण केले आहे.

भगवद्गीतेच्या बाराव्या अध्यायात 20 श्लोक आहेत तर ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायात एकूण 244 ओव्या अंतर्भूत आहेत. गीतेच्या बाराव्या अध्यायाप्रमाणेच गीतेतल्या अनुषंगाने ज्ञानेश्वरांनी आपला भक्तिमार्ग विषयक दृष्टीकोन येथे प्रगट केला आहे. भक्तिमार्गातील साधनभक्ती, साध्यभक्ती, भक्त परमेश्वर यांचे नाते, व्यक्तीपासना, अव्यक्तोपासना यातील तरतमभाव आदर्श भक्ताची लक्षणे इत्यादी अनेक विषय या अध्यायात आहेत. या अध्यायाचे प्रास्ताविक मंगलाचरण वैशिष्टयपूर्ण असून त्यात ज्ञानेश्वरांनी गुरूकृपादृष्टीवर मातेचे रूपक करून तिला वंदन केले तसेच मराठीच्या क्षेत्रात

साहित्य सोनिचिया खाणी। उघडवि देशियेचिया अक्षोणि

विवेकवेलीची लावणी। हो देई सैंध ।। अध्याय 12।।

अशी प्रार्थना करून साहित्यविषयक स्वप्न पूर्ण केले आहे. हे खरोखरच उदात्त आहे।

ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायातील गुरूमाऊलीचे रूपक

बाराव्या अध्यायाच्या आरंभी ज्ञानदेवांनी गुरूकृपादृष्टीचा महिमा प्रकट केला आहे. ते म्हणतात,

जय जय शुध्दे। उदार प्रसिध्दे

अनव्रत आनंदे। वर्षातिये ।।1।।

ज्ञा. अध्याय 12

स्वत: सिध्द असणाऱ्या सर्वश्रृत आणि निरंतर आनंदात वास करणाऱ्या हे गुरूकृपादाविष्टरूप् माऊली तुझा जयजयकार असो. माऊली जसे आपल्या लेकराचे लाड करते त्याला मांडिवर बसविते, त्याचे कौतुक करून त्याला पाळण्यात झोपविते त्याला ओवाळून त्याच्या अंगावर बाळलेणी देते द्द त्याचप्रमाणे गुरूकृपादृष्टी साधकाचे कोडकौतुक करून त्याचे लाड पुरवून त्याला साक्षात्कार घडविते. गुरूकृपेला पात्र ठरणारा विद्यावंत होतो.

म्हणैति साधका तूं माऊली। पिके सारस्वत तुझा पाऊली।
या कारणे मी साऊली। न संडी तुझी।।
अहो सद्‌गुरूचिये कृपादृष्टी। तुझे कारूण्य जेयाचे अधिष्ठी
ते सकळ विद्याचिये सृष्टी धात्रा होए।।9।।

म्हणोनि अंबे श्रीमंते। निजजन कल्पलते
आज्ञा पी माते। निरूपणी।।10।।

ज्ञा. अध्याय 12

**International Journal of Research in Economics and Social Sciences(IJRESS)**
Available online at http://euroasiapub.org/journals.php
Vol. 6 Issue 12, December 2016
ISSN: 2249-7382 Impact Factor: 6.225 | Thomson Reuters ID: L-5236-2015

सद्गुरूची कृपादृष्टी ज्याला होते तो सर्व विद्यारूपी सृष्टीचा निर्माता होतो म्हणजेच ब्रम्हदेव होतो. म्हणून भक्तांना कल्पत्मतेप्रमाणे असणाऱ्या श्रीमंतमाने मला या ग्रंथाचे निरूपण करण्याची आज्ञा दे. असे गुरूमाऊलीचे रूपक आले आहे.

मराठी भाषेचा गौरव

ज्ञानदेवांच्या मते गुरूकृपादृष्टी म्हणजे आपल्या भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारी कल्पकताच आहे. ते म्हणतात

नवरसी भरावी सागरू । करावि उचितरत्नांचे आगरू।
भावार्थाचे गिरिवरू। निकज वि माये ।।11।।
साहित्य सोनियाचिया खाणी। उघडवी देशियेचिया अक्षोणि।
विवेकवेलींची लावणी। हो दे सैध ।।12।।
मऱ्हाठियेच्या नगरी। ब्रम्हविद्येचा सुकाळू करी।।
घेणे देणे सुखाचे पेऱ्ही। हो देई या जगा।।16।।

ज्ञानदेव माऊली म्हणतात हे माते माझ्याकडून नवरसाचे सागर भरवून रत्नांच्या खाणी तयार करवून घे. भावार्थाचे श्रेष्ठ पर्वत निर्माण करवू, इतकेच नव्हे तर मराठी भाषेच्या भूमीमध्ये काव्यालंकाररूपी सोन्याच्या खाणी माझ्याकडून खोदवून घे. या मराठी नगरीमध्ये ब्रम्हविद्येचा सुकाळ कर इतका की, जगाचे देवघेवीचे सर्व व्यवहार मराठीभाषेमध्ये होवू दे.

योगदुर्गाचे रूपक

अव्यक्त अशा परब्रम्हाला आपलेसे करण्याचा मार्ग म्हणजे योगमार्ग. या ब्रम्हाला पाहण्याचे साधन योगी पुरूषांनी प्राप्त करून घेतले आहे. योगमार्ग कसा आहे हे सांगण्याच्या योगात ज्ञानदेवांनी योग हा अवघड किल्ला आहे, अशी कल्पना केली आहे. हा किल्ला जिंकण्यासाठी एखाद्या चतुर सेनापतींनी

**International Journal of Research in Economics and Social Sciences(IJRESS)**
Available online at http://euroasiapub.org/journals.php
Vol. 6 Issue 12, December 2016
ISSN: 2249-7382 Impact Factor: 6.225 | Thomson Reuters ID: L-5236-2015

आखलेले आक्रमवायचे टप्पे आणि योगसाधना करतांना याची सांगड घालून हे रूपक योजले आहे.

हे अर्जुना। जे मीच ब्रम्ह आहे या भावनेवर आरूढ होवून म्हणजेच या भावनेशी एकरूप् होवून अवथवरहित अक्षरब्रम्हाला कवटाळू पाहतात. त्या ठिकाणी मनाचे नखही स्पर्श करू शकत नाही, जेथे बुध्दीच्या दृष्टीचा शिरकाव होवू शकत नाही ते इंद्रियाद्वारे आकलन करण्याजोगे होईल काय? जे एके ठिकाणी कधीच सापडत नाही ते म्हणून ध्यान करण्यास कठिण असते. असे ब्रम्ह आविष्काराच्या आवाक्यात येईल काय?

पै वैराग्य महापावके। जाळूनी विजयांची कटकें
अधपली तंबके। इंद्रिये धरिली ।।46।।                ज्ञा.अध्याय 12

अव्यक्तोपासक भक्त वैराग्यरूप् अग्नीत सर्व विषयोपभोग जाळून सौरट धावण्याऱ्या गुरांना वेसण घालून] काठीच्या धाकाने मागे वळवून गोठयात आणतात. त्याचप्रमाणे इंद्रियांना मोठया परिश्रमाने संयमाचे वेसण घालून अंतर्मुख करावे लागते. त्यानंतर ते अपानवायुच्या दाराला वज्रासनाची मुद्रा लावून, मुलबंधाचा तटे सज्ज करतात. आशेचे पाश तोडून टाकतात. निद्रेचा काळोख घालवितात मनरूपी रेडयाचे मस्तक बळी देतात. नंतर इडा व पिंगळा या नाडयांचे ऐक्य करून अनाहताचा गजर करून सहस्त्रचक्रातील चंद्रामृत प्राशन करतात. अशा तऱ्हेने हा योगदुर्ग जिंकतात आणि अव्यक्ताचा प्राप्ती करून घेतात.

ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायातील भक्तीयोग

ज्ञानेश्वरीचा 12 वा अध्याय हा भक्तियोगाचे महात्म्य सांगणारा अध्याय आहे. त्यात भक्तिमार्गाचा महिमा वर्णन केला आहे. जे सगुण भगवंताच्या भक्ती मार्गाचा अवलंब करतात, त्यांना दुःख भोगण्याचा प्रसंग येत नाही. जे वर्णाश्रम धर्माच्या वाटयाला आलेली कर्मे करतात. विधीनिषेधाचे पालन करून सर्व कर्मफळे इश्वराला अर्पण करून जाळून टाकतात. त्यावेळी त्यांचे सर्व कर्मे इश्वरार्पण करून ते

**International Journal of Research in Economics and Social Sciences(IJRESS)**
Available online at http://euroasiapub.org/journals.php
Vol. 6 Issue 12, December 2016
ISSN: 2249-7382 Impact Factor: 6.225 | Thomson Reuters ID: L-5236-2015

ती नाहीसी करतात. त्यावेळी त्यांचे सर्व मनोव्यापार परमेश्वराच्या ठिकाणी केंद्रित झालेले असतात. अशा निरंतर उपासना करणाऱ्या भक्ताच्या ध्यानात, चित्तात परमेश्वर वास करतो. भोग, मोक्षसुख या दोन्ही गोष्टींचा ते त्याग करतात, कारण त्यांना परमेश्वरापुढे या गोष्टी तुच्छ वाटतात. भक्त आपले शरीर, मन परमेश्वराला अर्पण करतात. मनाने श्रीकृष्णरूपच होऊन जातात. सर्व समर्थ अशा भक्ताला भगवंत मदत करतात.

किंबहुना धनुर्धरा। जो मातेचेया ये उदरा।
तो मातेचा सोयरा। केतुला पां।। 83 ज्ञा.अध्याय 12

आई ज्याप्रमाणे आपल्या बाळासाठी कष्ट उपसते. त्याचे गुणदोष बघत नाही. त्याचप्रमाणे इश्वरही भक्ताचा स्वीकार करतात.

मझिया भक्त। आणि संसाराची चिंता
काय समर्थाची कांता। भूकेते कोरान्तमागे।85।।
तैसे ते माझे। कलत्र हे जाणिजे।
काईसेनि ही नलाजे। तेयाचिनि मी ।।86।।
आणि जे जे कर्म निकजे। ते थोडं बहुत नम्हाणिने।
निवांत चि अर्पिजे। माझा ठाई।।123।।

अशा रीतीन कर्तृत्व सोडून कर्म केले असता भोगवृत्ती नाहीसी होवून मनुष्य ब्रम्हरूप होतो. अविचल निष्ठेने देहत्यागानंतर सायुज्यमोक्षरूपी धामाला येवून पोहचशील असे श्रीकृष्ण सांगतात.

कर्मफळाचा त्याग

अभ्यासयोग कठीण वाटत असल्यास, कर्मे इश्वरार्पण करण्याचा उपदेश श्रीकृष्णाने अर्जुनाला केला. परंतु हेही जमत नसेल तर, तू कर्म करतांना माझी स्मरणपूर्व भक्ती कर. हेही जमत नसेल तर, जे कर्म घडेल त्याचे कर्म टाकीत जा. फळ मिळण्याची इच्छा करू नको. बुध्दीच्या मागे पुढे, कर्माच्या

International Journal of Research in Economics and Social Sciences(IJRESS)
Available online at http://euroasiapub.org/journals.php
Vol. 6 Issue 12, December 2016
ISSN: 2249-7382 Impact Factor: 6.225 | Thomson Reuters ID: L-5236-2015

आरंभी, शेवटी माझ्याशी स्मरणाने बांधलेल्या तुला जमत नसेल तर स्मरणाचा आग्रह सोडून दे पण विहित कर्माच्या बाबतीत संयम ठेव आणि कर्माचा त्याग कर. खडकावर पडलेला पाऊस, अग्निमध्ये केलेली पेरणी, झोपेत पडलेली स्वप्ने व्यर्थ असतात, त्याप्रमाणे कर्मेही व्यर्थ समज.

वन्हिची ज्वाला जैसी। वाया जाय आकासि
क्रिया जिरो दे तैसी। शुन्यामाजी ।।132।।
अर्जुना हा फलत्यागु। आवडे कीर आसलगु।
परि योगामानि योगु। धुरेचा हा ।।133।।

अग्निच्या ज्वाला ज्याप्रमाणे आकाशात व्यर्थ जातात, तशी तुझी कर्मे शुन्यामध्ये जिरून जाऊ दे. श्रीकृष्ण म्हणतात, हा कर्मफल त्याग सोपा वाटतो, पण योगामध्ये श्रेष्ठ आहे. फलत्यागपूर्वक कर्म केल्याने जन्ममरणाचा फेरा थांबतो. श्रीकृष्ण अर्जुनाला संपूर्ण शांती प्राप्त होण्याकरिता कोणत्या क्रमाने नावे लागेल तेही सांगतात. अभ्यासयोगाची प्राप्ती करून आत्मज्ञान प्राप्त करावे लागेल आणि ज्ञानाच्या साहायाने ध्यान करावे लागेल. ध्यानामध्ये मन एकाग्र होते. कर्मे दूर होतात, कर्मे दुरावल्याबरोबर फलत्याग साधतो आणि शांती प्राप्त होते. ज्याने शांती प्राप्ती केली, तो खरा भक्त असतो. अशा प्रकारे श्रीकृष्णानी अर्जुनाला भक्तीचा मार्ग सांगितला आहे.

ज्ञानी भक्ताची लक्षणे

ज्ञानी भक्ताची 36 लक्षणे सांगितली आहे. ती पुढीलप्रमाणे आहेत.

प्राणीमात्राशी मित्रत्वाने वागणारा, करूणामय अंत:करणाचा, ममत्वरहित, अहंकारवर्जित सुखदु:खाला समान माननारा, क्षमाशील, संतुष्ट वृत्तीचा, योगी, आत्मसंयमी, दृढनिश्चयी परमेश्वरचरणी मन, बुध्दी अर्पण करून राहिलेला लोकांचा कंटाळा न करणारा, हर्ष, क्रोध विशादयापासून अलिप्त, निस्पृह, पवित्र कार्यतत्पर, उदासिन, दु:खरहित, सर्व उद्योगाचा त्याग केलेला हर्षमुक्त, द्वेषरहित, दु:ख न करणारा, आकांक्षा न धरणारा, चांगल्या-वाईटाचा त्याग करणारा शत्रु व मित्र समान मानणारा,

मानापमान समान माणणारा, शित उष्ण दु:ख समान माणणारा नि:संग, निंदा स्तुती समान असणारा, मौन धारण करणारा, कोणत्याही स्थितीत संतोष मानणारा, निश्चित घर नसणारा, स्थिरबुध्दी असणारा, आणि भक्ति करणारा अशी भक्ताची लक्षणे सांगून हा भक्त प्रिय आहे असे श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले.

गीतेच्या दहाव्या आणि अकराव्या अध्यायात अनुक्रमे विभुतीयोग आणि विश्वरूप दर्शन याचे विवेचन आले आहे. आपल्या विश्वरूपाच्या ठिकाणी स्थिरचित व्हावे. असे भगवंताने अजफनाला सांगितले. अर्जुनाला देवाच्या सगुण की निर्गुण असा प्रश्न अर्जुनाला पडला, त्यावर श्रीकृष्णाने एकदा सगुण साकार आणि दुसऱ्यांना निर्गुण निराकार रूप धारण केले, तरी तो एकच आहे. सगुणोपासनेने परमेश्वराचे साकार स्वरूप् व निगुणोपासनेने त्याचे निराकार स्वरूप प्राप्त होते. या दोन्ही उपासनानांच भक्ती आणि योग अशी नावे आहेत. "सगुण निर्गुणो पासकांच्या द्वारापैकी कोणत्याही एका द्वाराने वैकुंठात म्हणजे श्रीकृष्णरूपात शिरता येते असे भगवंतांनी सांगितले आहे. एका सगुणरूपावरून दुसऱ्या विश्वरूपाची गोडी व सामर्थ्य कळण्यासारखे नाही काय? तुमचे विश्वरूप ओंकाराच्याही पलिकडे आहे. सोऽहं या महावाक्याने हटयोगी ज्याची उपासना करतात तो योगी आणि सगुण भक्ती करणारा भक्त या पैकी खरा योग मग कोणी जाणला"[1] असा प्रश्न अर्जुनाने उपस्थित केला. त्यावर भगवान श्रीकृष्णाने भक्तियोग सांगितला. उत्कट प्रेमाने भक्ती करणारे भक्त आवडतात, असे म्हटले. अव्यक्तोपासक भक्ती व व्यक्तोपासक भक्ती सांगितली. अव्यक्तोपासकांना खूप कष्ट सोसावे लागतात. तर व्यक्तोपासक भक्ताला म्हणजेच परमेश्वराच्या सगुण साकार रूपाची उपासना करणाऱ्या भक्ताला कष्टदशा अनुभवावी लागत नाही. आयुष्यमुक्तीचा सोपा मार्ग अर्जुनाला सांगितला आहे.

तरी व्यक्त आणि अव्यक्त। तूंचि एक निभ्रात।
भक्ती पाविजे व्यक्त। अव्यक्त योगे। ज्ञा. अ. 12/23

साकार निराकार तुच आहेस. साकाराची भक्ती प्राप्त होते व निराकाराची भक्ती योगमार्गाने

मिळते. अर्जुनाने श्रीकृष्णाला म्हटले, हे परमेश्वरा। तुझ्यापाशी पोहचायला भक्ती व योग या दोनच वाटा आहे. व्यक्त आणि अवक्त यापैकी कोणत्याही दाराच्या उंबरठयातून तुझ्यापर्यंत प्रवेश करता येतो, या दोन्हीचा परिणाम सारखाच आहे, तेव्हा भगवंतांनी अर्जुनाला म्हटले,

"मयावेश मनी ये मां नित्ययुक्ता उपासते
श्रध्दा परयोपेतास्ते मे युक्ततमा मता:"[2]

भगवतगीता अध्याय 12 ओ. 1

हे माझ्या ठिकाणी अत:करण स्थिर करून अहोरात्र तल्लीन असतात. परमश्रेष्ठ श्रध्देने संतुष्ट होवून माझी उपासना करतात. ते सगुणोपासक अतिशय उत्तम भक्त होत असे, माझे मत आहे. असे श्रीकृष्णाने अर्जुनाला म्हटले.

ज्ञानेश्वर हीच बाब दृष्टांत देऊन स्पष्ट करतात, हे अर्जुना अस्ताचलाजवळ पोहचलेल्या सूर्यबिंबाच्या मागोमाग जसे त्याचे किरण जातात तसे सर्व इंद्रियांसकट माझ्या ठिकाणी जे उपासना करतात अणि समुद्राला पोहचल्यावरही गंगेच्या प्रवाहाचा लोंढा मागे येतच राहतो. त्याचप्रमाणे त्यांच्या प्रेमभावनेला भरते येत राहतो. पावसाळयात नदीचे पाणी चढत जाते, त्याचप्रमाणे भक्ती करताना ज्याची श्रध्दा दुप्पटीने वाढताना दिसते. असे भक्त भक्तीमार्गी योगीच वाटतात. भक्तिमार्ग भक्तासाठी विविध पर्याय भगवंतांनी सांगितले आहे, मूर्तिपूजा ध्यानमार्ग, नामजप, प्रेमलक्षणन कर्मयोगी भक्ती, अभ्यासयोग अशा प्रकारे ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायात भक्तियोग आला आहे.

हे विश्वचि माझे घर। ऐसी मती जयाची स्थिर।
किंबहुना चराचर। आपण जाहला।। ज्ञा. अ. 12/223

"हे विश्वच माझे घर आहे, असा ज्याचा निश्चय झालेला असतो फार काय सांगावे सर्व स्थावर जंगमात्मक जग तो आपणच बनला. असे संत देहात दिसतात, पण देहाचे नसतात जगत दिसतात पण जगाचे नसतात"[3] ते विश्वव्यापक असतात असे ज्ञानेश्वर माऊली सांगतात.

**International Journal of Research in Economics and Social Sciences(IJRESS)**
Available online at http://euroasiapub.org/journals.php
Vol. 6 Issue 12, December 2016
ISSN: 2249-7382 Impact Factor: 6.225 | Thomson Reuters ID: L-5236-2015

समारोप :

"ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी म्हणजे मराठी अस्मितेचा मानबिंदू आहे"[4] आज एकविसाव्या शतकातही ज्ञानेश्वरीतील भक्तिमार्ग समाजाला दिशा देणारा आहे. "मराठी कवितेचा उगम ज्ञानदेव नामदेवाच्या सारस्वताने झाला तोही विराट सखोल सशक्त होता."[5] संतकाव्याने समाजाला भक्तीचा सोपा मार्ग सांगितल्या. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती उक्ती याप्रमाणे संतकविनी नवसमाज निर्मितीचे स्वप्न बघितले, समाजजीवनात परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. व्रतवैकल्ये कर्मकांड यापेक्षा भवभक्तीच्या सहाय्याने मोक्ष मिळविता येतो. अशी शिकवण संतकविंनी दिली."[6] त्यामध्ये ज्ञानेश्वरांचे साहित्य आहे. गुरूकृपेचे सामर्थ्य हा तर ज्ञानेश्वरांच्या प्रीतीचा आणि जिव्हाळयाचा विषय गुरूच्या ठिकाणी त्याची श्रध्दा अनन्यसाधारण आहे."[7] गुरूकृपेंमुळे सगळया गोष्टी सहज शक्य होतात हा भाव या अध्यायातील गुरूमाऊलीच्या रूपकात आल्या आहे. गुरूकृपेमुळे ज्ञानदेवांनी साहित्य सोनियाच्या खाणी तयार केल्या आहेत. तसेच या अध्यायात योगदुर्गाचे रूपक, ज्ञानी भक्ताची लक्षणे भक्ताची श्रीकृष्णाने केलेली प्रसंशा, कर्मयोगी भक्ती, भक्तीमार्गाचे स्वरूप् नामभक्तीचे महात्म्य शांतीसुख लाभलेला भक्त असे, अनेक विषय आहे. तसेच या अध्यायामधून ज्ञानदेवांनी असा भाव व्यक्त केला आहे की, योग्याच्या भक्तीपेक्षा सामान्य माणसाने केलेली नामस्मरणात्मक सगुण भक्ती श्रेष्ठ व सोपी आहे. ज्ञानदेवांनी सांगितलेला भक्तिमार्ग आजच्या संगणकाच्या आणि विज्ञानाच्या युगातही उपयोगी आहे.

निष्कर्ष :

१. ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेचे तत्वज्ञान संस्कृत मधून मराठी मध्ये आणले या ग्रंथाचे नाव ज्ञानेश्वरी आहे.
२. ज्ञानेश्वरांनी बाराव्या अध्यायातून गुरूकृपादृष्टीचा महिमा विषद केला आहे.

३. मराठी भाषेचा गौरव या अध्यायात आला आहे. या मराठीच्या नगरीमध्ये ब्रम्हविद्येचा सुकाळ होवून देवघेवीचे सर्व व्यवहार मराठी मध्ये व्हावेत असे ज्ञानेश्वरांना वाटते.

४. ज्ञानदेवांनी या अध्यायात योगदुर्गाचे रूपक स्पष्ट केले आहे. योगमार्ग खडतर आहे असा भाव या रूपकातून स्पष्ट होतो.

५. सामान्य माणसांनी केलेली नामस्मरणात्मक सगुण भक्ती श्रेष्ठ आहे असे या अध्यायातून स्पष्ट आहे.

संदर्भ टीपा

१. संपा. डॉ. मदन कुलकर्णी, ज्ञानेश्वरी अध्याय बारावा, विजय प्रकाशन, नागपूर, 2003 पृ.क्र.

२. श्री. श्रीपाद ए.सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुदास, भगवद्गीता, भक्तिवेदांन्त बुक ट्रस्ट, मुंबई, 1996, पृ 438

३. श्रीहरी महाराज लोडे, पसायदान प्रकाशक पुष्पाताई लोडे, पानसवाडी, सोनई, 2002 पृ. 29

४. डॉ. उषा माधव देशमुख, ज्ञानेश्वरी : विलसिते, ज्ञानेश प्रकाशन, नागपूर, 2005, पृ.क्र. 6

५. तत्रैव - पृ.क्र. 9

६. तत्रैव - पृ.क्र. 9

७. ल.रा. नसिराबादकर, प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, दहावी आवृत्ती, 2013 पृ. क्र.60

संदर्भ ग्रंथसूची


- संपा. कुलकर्णी मदन, 'ज्ञानेश्वरी अध्याय बारावा', विजय प्रकाशन, नागपूर, 2003
- दांडेकर रां.वा., ज्ञानेश्वरी सातवी, स्वानंद प्रकाशन, आळंदी, 1980
- देशमुख उषा माधव, ज्ञानेश्वरी : विलसिते, ज्ञानेश प्रकाशन, नागपूर, 2005
- नसिराबादकर ल.रा., प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, दहावी आवृत्ती, 2013
- लोंडे श्रीहरी महाराज, पसायदान, प्रकाशक पुष्पाताई लोंडे, पानसवाडी, सोनई, 2002.